| MHKO030086032022 | |
|---|---|
| | दाखल तारीख – २६/०९/२०२२<br>नोंदणी तारीख – २६/०९/२०२२<br>निकाल तारीख – ३०/०५/२०२४<br>कालावधी – वर्षे महिने दिवस<br>०१. ०८. ०४. |

..............................................................................

## कोल्हापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.१), कोल्हापूर यांचे न्यायालयात...

**(पिठासीन अधिकारीः एम.एम.पळसापुरे)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.५६१२/२०२२** **निशाणीः ०७ सोबत**

महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी
करवीर पो. ठाणे, कोल्हापुर ] अभियोगपक्ष

*विरूध्द*

१. प्रदिप प्रकाश संकपाळ
व.व. ३२, व्यवसाय.– सलुन
रा. प्लॉट नं. ५० जनाई दत्तनगर, रिंगरोड कळंबा,
ता. करवीर

२. जय नारायण जाधव,
व.व. ५२, व्यवसाय.– नमूद नाही
रा. २४८०, बी मंगळवार पेठ, कोल्हापूर ] आरोपी

==========================================

उपस्थिती –

श्रीमती ए. व्ही. जोशी – अभियोगपक्षातर्फे वकिल
श्री. ए. डी. पाटील – आरोपींतर्फे वकिल

==========================================

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडलेली तारीख | २८/०७/२०२२ |
| २ | प्रथम खबर | २८/०७/२०२२ |
| ३ | दोषारोप पत्र दाखल तारीख | २६/०९/२०२२ |
| ४ | दोषारोप तारीख | २२/०६/२०२३ |
| ५ | पुरावा सुरु झालेची तारीख | ३०/०५/२०२४ |
| ६ | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | ३०/०५/२०२४ |
| ७ | निकाल तारीख | ३०/०५/२०२४ |
| ८ | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

**आरोपी विषयी माहिती**

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रदिप प्रकाश संकपाळ | नोटीस | २२.६.२०२३ | महाराष्ट्र जुगार प्रतिबंध का.कलम १२अ प्रमाणे | निर्दोष मुक्तता |
| २ | जय नारायण जाधव | --/-- | --/-- | --/-- | --/-- |

**फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**(अ) – अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी –**

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नेमिनाथ रामचंद्र कापसे | पंच, नि.७ सोबत |

(ब) – **बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक**

(क) – **न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक**

**फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक –**

## (अ) – <u>अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक</u> –

| अ. क्र | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | ११ | पंचनाम्यावरील सही |

**(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक**

**(क) – न्यायालया तर्फे निशाणी – निरंक**

**(ड) – महत्वपूर्ण वस्तू : रोख रक्कम व जुगाराचे साहित्य.**

## न्यायनिर्णय

(जाहीर दिनांकः ३० मे, २०२४)

अभिलेखावरील पुरावा लक्षात घेता प्रकरणाचे निश्चितीसाठी माझ्या विचारार्थ पुढील मुद्दे आले असून त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २८/०७/२०२२ रोजी १९.४५ वाजताच्या सुमारास जनाईनगर, रिंगरोड कळंबा ता. करवीर येथे आरोपी नं.१ यांनी स्वतःच्या व मटका मालक आरोपी क्र. २ यांच्या फायदयाकरीता लोकांकडून पैसे घेऊन मुंबई मटका नावाचा जुगार सार्वजनिक ठिकाणी खेळताना व खेळविताना मिळून आले? | नकारार्थी. |
| २ | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे.. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्रं.१ बाबत</u>**

२. अभियोगपक्षाने आरोपींविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी वर नमुद केले केवळ पंच साक्षीदार यांना तपासले आहे. अभिलेखावर दाखल कागदपत्रे निष्कर्ष नोंदवताना योग्य त्या ठिकाणी चर्चेणेत येतील.

३. अभियोगपक्षाच्या कथनानुसार दिनांक २८/०७/२०२२ रोजी १९.४५ वाजताच्या सुमारास जनाईनगर, रिंगरोड कळंबा ता. करवीर येथे आरोपी नं. १ यांनी स्वतःच्या व मटका मालक आरोपी नं. २ याच्या फायदयाकरीता लोकांकडून पैसे घेऊन मुंबई मटका नावाचा जुगार सार्वजनिक ठिकाणी खेळताना व खेळविताना मिळून आले.

४. साक्षीदार क्र.१ नेमीनाथ रामचंद्र कापसे यांच्या साक्षेची पाहणी केली असता दिनांक २८/०७/२०२२ रोजी पोलिसांनी त्यांना करवीर पोलिस स्टेशन येथे पंचनामा करणेसाठी बोलवले होते व त्या ठिकाणी पंचनाम्यावर त्यांची सही घेतली. त्यांनी पंचनाम्यावरील सही वगळता त्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य जप्त केल्याचे त्यांनी स्पष्टपणे नाकारले आहे.

५. सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने विद्वान सरकारी वकिलांनी त्यांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार सूचक प्रश्न विचारले. परंतु त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही.

६. फौजदारी प्रकरणांमध्ये आरोपीविरूध्दचा गुन्हा सर्व संशयापलीकडे सिध्द होणे आवश्यक असते. सदर प्रकरणात घटनास्थळ व जप्ती सिध्द होणे आवश्यक होते, परंतु घटनास्थळ व जप्ती पंच फितूर झाल्याने आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. घटनास्थळाची पाहणी केली असता गावातील ठिकाण असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत तपासी अधिकारी यांना सहजरित्या स्वतंत्र साक्षीदार मिळू शकले असते. परंतु अभिलेखाची पाहणी केली असता कुठल्याही स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब नोंदवल्याचे दिसून येत नाही. सदर बाब अभियोगपक्षाविरूध्द निष्कर्ष काढण्यास पुरेशी आहे. तसेच प्रस्तुत कामातील साक्षीदार यांना वारंवार समन्स पाठवुन देखील ते याकामी गैरहजर राहीलेले आहे. निशाणी १ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. या सर्व बाबींचे अवलोकन करता अभियोगपक्ष आरोपींविरूध्द ठेवलेले आरोप ठोस पुराव्यानिशी सिध्द करण्यास अपयशी ठरल्याचे दिसून येते. आरोपी हे कल्याण मटका नावाचा जुगार सार्वजनिक ठिकाणी खेळत व

खेळवित असल्याचा पुरावा पटलावर न आल्याने मी मुद्दा क्रं.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रं.२ बाबत**

७. उपरोक्त नमूद विवेचनावरून अभियोगपक्ष आरोपींवरील दोषारोप निःसंशय व निर्विवादपणे सबळ पुराव्याअभावी सिध्द करू शकलेला नाही. सबब मुद्दा क्रं.२ च्या उत्तरात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र. १ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२(अ) नुसार शिक्षेस पात्र गुन्हयातून निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलके व जामीनकदबे रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रु.७,५००/–चे बंधपत्र दयावे. सदर जामीनपत्र व बंधपत्र आदेशापासून सहा महिन्यांपर्यंत वैध राहतील.

४. अपील कालावधी संपल्यानंतर खटल्यातील जप्त मुद्देमाल जुगाराचे साहित्य विनाउपयोगी असल्याने नाश करण्यात यावे व जप्त रोख रक्कम रू.१२,४००/– अपील कालावधी संपल्यानंतर शासन जमा करावेत.

५. आदेशाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ नुसार पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

Digitally signed by MAHESH MANOHAR PALSAPURE
Date: 2024.05.31 13:32:08 +0530

दि.३०/०५/२०२४.
कोल्हापूर

(एम.एम.पळसापुरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.१),
कोल्हापूर